दरम्यान, 'टाटा मुंबई मॅरेथॉन 2027 ड्रीम रन'च्या नोंदणीचा शुभारंभ मंगळवारी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आला.

# लोकमान्य टिळक सर्वसाधारण रूग्णालयात 'एचएमआयएस प्रणाली'च्या पथदर्शी प्रकल्पाची अति. आयुक्त प्राजक्ता वर्मा - लवंगारे यांच्याकडून पाहणी

**मुंबई, दि. ८ : प्रतिनिधी**

लोकमान्य टिळक सर्वसाधारण रूग्णालय (शीव) येथे 'हॉस्पिटल मॅनेजमेंट इन्फॉर्मेशन सिस्टिम' (HMIS) या प्रणालीच्या प्रायोगिक तत्वावरील अंमलबजावणीला सुरूवात झाली आहे. पहिल्या टप्प्यात बाह्यरूग्णांची नोंदणी करणे आणि शुल्क अदा करण्यासाठी डिजिटिल पेमेंटची सुविधा उपलब्ध करून देणे, यासारख्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर या पथदर्शी प्रकल्पाची पाहणी अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) प्राजक्ता वर्मा - लवंगारे यांनी आज (दिनांक ८ सप्टेंबर २०२६) केली.

पहिल्या टप्प्यात 'एचएमआयएस' प्रणालीची अंमलबजावणी करताना रूग्ण व नातेवाईकांसाठी सुलभ पद्धतीने वापरता येईल, याद्दष्टीने उपाययोजना कराव्यात, अशी सूचना प्राजक्ता वर्मा - लवंगारे यांनी केली. दुसऱया टप्प्यात रुग्णांचा वैद्यकीय तपशिल नोंदविण्यासाठी 'टेक्स्ट टू स्पीच' यासारख्या अत्याधुनिक कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करावा. त्यामुळे रुग्णांच्या आणि डॉक्टरांच्या वेळेची बचत होण्यासोबतच डॉक्टरांचे कामही सुलभ होईल.

लोकमान्य टिळक सर्वसाधारण महानगरपालिका रूग्णालय येथे बाह्यरूग्ण विभागात येणाऱ्या रूग्णांची नोंदणी संगणकाद्वारे करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. याठिकाणी दररोज १५ हजार बाह्यरूग्णांची नोंद करण्यात येते. या रूग्णांची वैद्यकीय माहिती नोंदवून घेत पहिल्या टप्प्यातील नोंदणी करण्यात येईल. त्यामुळे प्रणालीच्या वापरा अंतर्गत रुग्णांचा नोंदणी प्रक्रियेतील प्रतिक्षा कालावधी कमी होण्यास यामुळे मदत होणार आहे.



बाह्यरूग्ण सेवेसाठी आवश्यक असणारे नोंदणी शुल्क 'मोबाईल युपीआय पेमेंट'द्वारे अदा करण्याची सुविधाही त्याच खिडकीवर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

लोकमान्य टिळक सर्वसाधारण रूग्णालयात विविध वैद्यकीय उपचारासांठी मोठ्या प्रमाणात रूग्ण दाखल होत असतात. अशावेळी रूग्णांना नोंदणीसाठी रोख पैसे अदा करण्याची सुविधा उपलब्ध करून देतानाच ऑनलाईन पद्धतीने युपीआय पेमेंटची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी, असे निर्देश अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) प्राजक्ता वर्मा - लवंगारे यांनी दिले होते. पहिल्या टप्प्यातील एचएमआयएस प्रणालीचा वापर आता या रूग्णालयात अंतर्गत स्तरावर सुरू करण्यात आला आहे.

बाह्यरूग्ण विभागाच्या नोंदणी खिडकीच्या ठिकाणी 'डिजिटल पेमेंट'साठी १० पीओएस मशीन लावण्यात आल्या आहेत. तसेच एचएमआयएस प्रणालीच्या पहिल्या टप्प्यातील पथदर्शी प्रकल्पाचीही अंमलबजावणी करण्यात आली आहे. रूग्णांनी नोंदणीसाठी आधार कार्ड आणि मोबाईल क्रमांक आदी माहिती देणे गरजेचे आहे.

'एचएमआयएस' प्रणाली अंमलबजावणीच्या दुसऱया टप्प्यात रूग्णांचा इतिहास, चिकित्सा अहवाल, सोनोग्राफी, एमआरआय, सीटी स्कॅन यासारख्या वैद्यकीय तपासण्यांचे ऑनलाईन शुल्क अदा करण्यासाठी 'डिजिटल पेमेंट'चा पर्यायदेखील भविष्यात उपलब्ध होणार आहेत. तसेच 'एचएमआयस' प्रणालीही संपूर्ण क्षमतेने अंमलात आणण्याचा रूग्णालय प्रशासनाचा मानस आहे.

लोकमान्य टिळक सर्वसाधारण रूग्णालयात दररोज विविध आजारांवर उपचार घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात बाह्य रूग्ण येत असतात. या सर्व रूग्णांची 'एचएमआयएस' प्रणालीअंतर्गत डिजिटल नोंद घेण्यात येत आहे. या नोंदणीसोबतच रूग्ण आणि नातेवाईकांना डिजिटल पेमेंटचा पर्याय देण्यात आला आहे. त्यामुळे रोख पैसे किंवा सुट्टे पैसे देण्याची गैरसोय टाळत आता डिजिटल पेमेंटचा कॅशलेस पर्याय रूग्णांसाठी उपलब्ध झाला आहे.

# "नियम फक्त हिंदू सणांसाठीच का?" नितेश राणेंचा सवाल

**मुंबई, दि. ८ : प्रतिनिधी**

गरब्यात कोणाला प्रवेश द्यायचा, डीजेवर निर्बंध असावेत का आणि हिंदू सणांबाबतच नियम-कायदे का सांगितले जातात, यावरून मंत्री नितेश राणे यांनी आक्रमक भूमिका मांडली. गरबा हा राजकीय नव्हे तर धार्मिक विषय असल्याचे सांगत त्यांनी गरब्यात सहभागी होणाऱ्या मुस्लिम तरुणांबाबतही प्रश्न उपस्थित केले.

गरब्यात कोण येणार आणि कोण येणार नाही, हा राजकीय विषय नसून धार्मिक विषय असल्याचे राणे म्हणाले. ईदच्या वेळी इतर धर्मीयांना सहभागी होण्याची परवानगी दिली होती का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. गरब्यात मुस्लिम तरुण मोठ्या संख्येने येतात आणि हिंदू मुलींना लक्ष्य करून प्रेमाच्या जाळ्यात फसवले जाते, असा आरोपही त्यांनी केला. अशा प्रकारांना जबाबदार कोण, असा सवाल करत गरब्यात सहभागी व्हायचे असल्यास हिंदू धर्म स्वीकारला पाहिजे, असे मत राणे यांनी व्यक्त केले.

राज ठाकरे यांच्या भूमिकेवर प्रतिक्रिया देताना राणे यांनी हिंदू समाजालाच सातत्याने नियम आणि सल्ले का दिले जातात, असा सवाल केला. हिंदू सणांच्या वेळीच नियम, आवाहने आणि सल्ले का दिले जातात, असा प्रश्न उपस्थित करत मुस्लिम धर्मगुरूंकडून जिहाद शिकवला जात असल्याचा आरोप त्यांनी केला. अशा धर्मगुरूंच्या विरोधात बोलण्याचे धैर्य दाखवावे, असे आव्हानही त्यांनी दिले.

डीजे बंदीच्या मुद्द्यावरही राणेंनी भूमिका स्पष्ट केली. ईदच्या वेळी डीजे वाजत नाही का, असा सवाल करत सण पारंपरिक पद्धतीने साजरे करायचे असतील तर सर्वच धर्मांचे सण पारंपरिक पद्धतीने साजरे झाले पाहिजेत, असे ते म्हणाले. हिंदू समाज नियम आणि संविधानाचे पालन करतो, मग मुस्लिम समाजानेही नियमांचे पालन करायला नको का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. मशिदींवरील भोंग्यांच्या आवाजाची पातळी कोण मोजणार, असा प्रश्नही त्यांनी केला.

मराठा आरक्षणाच्या आंदोलनाबाबत सरकारची भूमिका सकारात्मक असल्याचे राणे यांनी सांगितले. मराठा समाजाच्या प्रश्नावर सरकार संवेदनशील असून, सर्व समाजाला न्याय देण्याची भूमिका सरकारची असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

संजय राऊत यांच्या टीकेवर बोलताना राणे यांनी त्यांच्यावरही निशाणा साधला. राऊत यांनी आधी आपल्या 'मालकाला' सांगावे, असे म्हणत त्यांच्या राजकीय नेतृत्वावर टीका केली. त्यांचे मालकच संध्याकाळी याच गुजराती समाजाच्या सोहळ्यात सहभागी होऊन नाचतात, असा दावा करत राणे यांनी राऊत यांना टोला लगावला.

गरबा, डीजे आणि धार्मिक नियमांच्या मुद्द्यावरून सुरू असलेल्या चर्चेला नितेश राणे यांच्या वक्तव्यामुळे आणखी धार आली असून, सर्व धर्मांच्या सणांसाठी समान नियम असावेत, अशी भूमिका मांडत त्यांनी हिंदू सणांपुरतेच नियम आणि आवाहने मर्यादित का ठेवली जातात, असा थेट सवाल केला आहे.

# विद्यार्थी हित, गुणवत्तापूर्ण साहित्य आणि वाचन संस्कृती वृद्धीसाठी प्रकाशकांनी पुढाकार घ्यावा- मंत्री दादा भुसे

**मुंबई, दि. ८ : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण, त्रुटीविरहित आणि परवडणारे शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे ही सर्व संबंधितांची सामूहिक जबाबदारी असून पालकांवरील आर्थिक भार कमी करण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती वाढविण्यासाठी प्रकाशकांनी सकारात्मक भूमिका घ्यावी, असे प्रतिपादन शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी केले. राज्यातील विविध प्रकाशन संस्थांच्या प्रतिनिधींसमवेत मंत्री दादाजी भुसे यांनी मंत्रालयात आयोजित बैठकीत संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते.

शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे म्हणाले, शैक्षणिक साहित्यामधील व्याकरण, इतिहास किंवा विषयवस्तूसंदर्भातील त्रुटी टाळण्यासाठी विषयतज्ज्ञ, व्याकरण आणि इतिहासाचे जाणकार यांच्या मार्गदर्शनाचा अधिक प्रभावी वापर करणे आवश्यक आहे. एखाद्या प्रकाशनातील त्रुटीमुळे शासनाबाबत गैरसमज निर्माण होऊ नयेत यासाठी प्रकाशकांनी अधिक दक्षता घ्यावी. प्रत्येक शैक्षणिक साहित्य शास्त्रीय आणि तथ्याधिष्ठित असावे असेही त्यांनी सांगितले. पालकांकडून विविध पुस्तकांच्या वाढत्या किमतींबाबत सातत्याने तक्रारी येत असल्याचे नमूद करून मंत्री भुसे यांनी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आवश्यक साहित्याची किंमत वाजवी ठेवण्यावर भर दिला. शाळा, संस्था आणि प्रकाशक यांनी समन्वयाने काम करून पालकांवरील आर्थिक भार कमी करण्याचे मार्ग शोधावेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

कृत्रिम बुद्धिमत्ता, ई-बुक, क्यूआर कोड, व्हिडिओ आधारित शिक्षणसाहित्य आणि सराव प्रश्नसंच यांसारख्या आधुनिक साधनांचा वापर वाढत असताना विद्यार्थ्यांच्या वयोगटानुसार आणि अभ्यासक्रमाशी सुसंगत साहित्य विकसित करण्याची आवश्यकता असल्याचे मंत्री भुसे यांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या मातृभाषा आणि स्थानिक बोलीभाषांचा विचार करून तयार करण्यात आलेले साहित्य प्राथमिक शिक्षण अधिक प्रभावी बनवू शकते, असेही त्यांनी नमूद केले.

वाचन संस्कृतीला चालना देण्यासाठी राज्यात विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचा विभागाचा विचार असल्याचे सांगून, 'बुके नको, बुक द्या' ही संकल्पना व्यापक लोकचळवळ बनविण्याची गरज असल्याचे मंत्री भुसे यांनी नमूद केले. शाळांमध्ये लघु वाचनालये, पुस्तक महोत्सव, वाचन स्पर्धा आणि पुस्तक प्रदर्शनांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लावता येईल. याबाबत विभागाने सकारात्मक पावले उचलावीत, अशा सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

## SELF DECLARATION

I **MRS. RANJANA DEVI ATUL KUMAR SHUKLA (Nee MISS. RANJANA DEVI A. PANDEY)** residing at Flat No. 101, Omkareshwar Apartment, Agaason Road, Diva (E)- 4000612.

I say that my maiden name is **MISS. RANJANA DEVI A PANDEY** I say that I got married with **MR. ATUL KUMAR SHUKLA** on 06.05.2023 at Amethi, Uttar Pradesh.

I say that as per Government Gazette, I had changed my name from **MISS. RANJANA DEVI A PANDEY** to **MRS. RANJANA DEVI ATUL KUMAR SHUKLA** under Government Gazette Sr. No.M-25429764, dated 22-28 January, 2026.

I say that after marriage, my name has been changed as **MRS. RANJANA DEVI ATUL KUMAR SHUKLA** by virtue of said marriage and since then I am known as **RANJANA DEVI ATUL KUMAR SHUKLA.**

I say that **MISS. RANJANA DEVI A PANDEY** and **MRS. RANJANA DEVI ATUL KUMAR SHUKLA** belongs to one person only and one and the same persons i.e. myself and none else.

Sd/-

**Date: 09.09.2026** **MRS. RANJANA DEVI ATUL**
**Place: Mumbai** **KUMAR SHUKLA**

# 'आमची अंगणवाडी, आमची जबाबदारी' संकल्पनेतून मुंबईत 'राष्ट्रीय पोषण माह' उपक्रम

**मुंबई, दि. ८ : प्रतिनिधी**

देशभरात राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय पोषण माह २०२६ अंतर्गत मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यात ९ सप्टेंबर ते ८ ऑक्टोबर या कालावधीत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. 'आमची अंगणवाडी, आमची जबाबदारी' या संकल्पनेतून अंगणवाडी केंद्रांच्या माध्यमातून बालक, गर्भवती महिला, स्तनदा माता तसेच किशोरवयीन मुली यांच्या पोषण व आरोग्याबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. नागरिकांनी आपल्या परिसरातील अंगणवाडी केंद्राशी जोडले जावे, बालकांच्या आरोग्य व पोषणाकडे लक्ष द्यावे आणि कुपोषणमुक्त मुंबईसाठी योगदान द्यावे, असे आवाहन महिला व बाल विकास विभागाच्यावतीने करण्यात आले आहे. मुंबई शहर व उपनगरातील अंगणवाडी केंद्रांच्या माध्यमातून पोषण रॅली, पालक बैठका, जनजागृती कार्यक्रम, पाककला स्पर्धा, पोषण प्रदर्शन, वाढ मापन, आरोग्य तपासणी, पोषण शपथ तसेच विविध प्रबोधनात्मक उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. कुपोषण निर्मूलनासोबतच पहिल्या १,००० दिवसांचे महत्त्व, पूरक आहार, स्तनपान, बाल संगोपन, स्वच्छता व आरोग्यदायी जीवनशैली याबाबत कुटुंबांमध्ये जनजागृती करण्यासाठी अंगणवाडी सेविका, मदतनीस, मुख्यसेविका व बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले जाणार आहेत.

पहिल्या हजार दिवसांचे महत्व, पोषण व आहार बालकांची वाढ व विकास कार्यक्रम, माता व किशोरवयीन मुलींचे आरोग्य, समुदायाचा सहभाग या पाच प्रमुख कार्यक्रमांवर भर देण्यात येणार आहे.

मुंबई शहर व उपनगर जिल्ह्यातील अंगणवाड्यांमध्ये खालील पाच मुख्य विषयांवर आधारित उपक्रम राबवले जाणार आहेत. आहारातील विविधता आणि पुरेसे प्रथिने, पूरक पोषण आहार, समुदायाची मालकी व उत्तरदायित्व, बालविकासासाठी पोषण आणि बाल्यकालीन उद्दीपन, प्रधानमंत्री मातृ वंदना योजना असे मुख्य पाच उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

आहारातील विविधता आणि पुरेसे प्रथिने या उपक्रमाअंतर्गत आहारातील धान्ये, भरडधान्ये, कडधान्ये, फळे, भाज्या, दूध आणि प्राणिजन्य-वनस्पतीजन्य प्रथिनयुक्त पदार्थांचे सेवन वाढवण्यासाठी 'प्रथिनयुक्त ताट स्पर्धा' व पोषण मेळाव्यांचे आयोजन केले जाईल. पूरक पोषण आहार कार्यक्रमांतर्गत लाभार्थ्यांना ताजे, स्वच्छ आणि पौष्टिक गरम शिजवलेले अन्न मिळण्यासाठी साप्ताहिक मेनू बदलाची प्रभावी अंमलबजावणी केली जाईल. तसेच पालक व स्वयं-सहाय्यता गटांच्या सहभागाने भोजनाची चव चाखण्याचे सत्र आयोजित केले जाईल.

समुदायाची मालकी व उत्तरदायित्व या उपक्रमाअंतर्गत नव्याने स्थापन करण्यात आलेल्या 'अंगणवाडी व्यवस्थापन समित्या' (AMC) सक्रिय करून सेवा वितरणाची गुणवत्ता सुधारली जाईल. तसेच प्रत्येक अंगणवाडी केंद्रात पूरक पोषण आहाराचा तक्ता ('SNP मेनू बोर्ड') प्रदर्शित करून पारदर्शकता वाढवली जाईल. बाल विकासासाठी पोषण आणि बाल्यकालीन उद्दीपन या उपक्रमाअंतर्गत पहिल्या १,००० दिवसांतील मुलांच्या मेंदूच्या विकासासाठी सुधारित गृहभेट नियोजन प्रणाली प्रभावीपणे राबवली जाईल. याद्वारे बालक काय खाते आणि कसे शिकते यामधील संबंधांवर भर दिला जाईल. तसेच, प्रधानमंत्री मातृ वंदना योजना (PMMVY) अंतर्गत मातृत्व लाभ योजनेला १० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त पात्र गर्भवती व स्तनदा महिलांची १०० टक्के संपृक्तता मोहीम राबवून थेट लाभ हस्तांतरणास (DBT) गती दिली जाईल. मुंबई शहर आणि उपनगर जिल्ह्यातील नागरिकांनी, मातांनी व पालकांनी या अभियानात मोठ्या संख्येने सहभागी होऊन अंगणवाड्यांमार्फत दिल्या जाणाऱ्या सेवांचा लाभ घ्यावा आणि मोहिमेला यशस्वी करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# श्वानांना अन्न पुरवणाऱ्यांना मुंबई विद्यापीठाच्या कलिना परिसरात प्रवेशबंदी

**मुंबई, दि. ८ : प्रतिनिधी**

मुंबई विद्यापीठाच्या कलिना परिसरातील विद्यानगरीमध्ये श्वानांना नियमितपणे खाद्य पुरविणाऱ्या स्वयंसेवी संस्थासह श्वानप्रेमींना सुरक्षा यंत्रणेकडून बंदी घालण्यात आली आहे. त्यामुळे विद्यानगरीच्या २८० एकर परिसरात असलेल्या ८५ श्वानांवर मागील काही दिवसांपासून उपासमारीची वेळ आली आहे. या प्रकरणी तातडीने हस्तक्षेप करून श्वानांसाठी अन्न व पाण्याची व्यवस्था पूर्ववत करावी, अशी मागणी स्वयंसेवी संस्थांसह श्वानप्रेमींकडून विद्यापीठ प्रशासनाकडे करण्यात आली आहे.

विद्यानगरीच्या विविध भागांत सुमारे ८५ श्वान वास्तव्यास आहेत. या श्वानांना अनेक श्वानप्रेमी आणि स्वयंसेवी संस्था दिवसांतून दोन वेळा अन्न देतात. बीकेसीतून चार ते पाच श्वानप्रेमी हे नियमितपणे विद्यापीठात येऊन तेथील श्वानांना अन्न देतात. विद्यापीठ परिसरातील काही श्वानप्रेमीही या कामात त्यांना मदत करतात. मात्र २५ ऑगस्टपासून सुरक्षा रक्षकांकडून त्यांना परिसरामध्ये प्रवेश दिला जात नाही. त्यामुळे या श्वानांची प्रकृती खालावली आहे. श्वानांना दररोज अन्न उपलब्ध करून द्यावे यासाठी विद्यापीठातील अधिकाऱ्यांशी संपर्क साधला, मात्र त्याचा काहीही परिणाम झाला नसल्याची माहिती श्वानप्रेमींनी नाव न छापण्याच्या अटीवर दिली. सरकारी प्राधिकरणाने श्वानप्रेमी म्हणून दिलेले ओळखपत्र आमच्याकडे आहेत. विद्यापीठ प्रशासनाने आमची ओळखपत्रे तपासून आम्हाला प्रवेश द्यावा. प्रशासनाला योग्य वाटेल अशा निश्चित ठिकाणी आम्ही श्वानांना खाद्य देऊ शकतो, असेही त्यांनी सांगितले.

मुंबई विद्यापीठ प्रशासनाने श्वानांना खाद्य देणाऱ्या व्यक्तींनाच परिसरात प्रवेश नाकारला आहे. हा अमानुष प्रकार आहे. त्यामुळे हा प्रवेशबंदीचा आदेश नेमका कोणी दिला, याची चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या महाराष्ट्र राज्य विभागाचे सचिव नितीन ननावरे यांनी कुलगुरूंना पत्र पाठवून केली आहे. विद्यापीठाचा परिसर हा केवळ वर्गखोल्या, कार्यालये आणि प्रशासकीय कामकाजापुरता मर्यादित नसून संवेदनशीलता, सहअस्तित्व आणि सामाजिक जबाबदारी यांसारखी मूल्ये प्रतिबिंबित करणारे ठिकाण असावे, असेही त्यांनी तक्रारीत नमूद केले आहे.

सर्वोच्च न्यायालय आणि शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे मुंबई विद्यापीठाकडून पालन करण्यात येत आहे. विद्यापीठ परिसरात बाहेरून येणाऱ्या श्वानप्रेमींना त्यांना अन्न पुरविण्यापासून थांबिवण्यात आले आहे.

## VEEKAYEM FASHION AND APPARELS LIMITED

REGD. OFF.:- 113, UDYOG BHAVAN, SHARMA IND. ESTATE, WALBHAT ROAD, GOREGAON EAST, MUMBAI-400063, MAHARASHTRA, INDIA
Email: hemant.gupta@vkmgroups.biz Website:www.vkmgroups.com
Telephone No. 022-40351414, 40351481
CIN:L17120MH1985PLC037516

**NOTICE FOR 41st ANNUAL GENERAL MEETING AND E-VOTING INFORMATION**

**NOTICE IS HEREBY GIVEN THAT:**

1.The 41st Annual General Meeting (AGM) of the Company will be held on Wednesday, 30th September, 2026 at 04:30 P.M. (IST) at the registered office of the Company situated at 113, Udyog Bhavan, Sharma Ind. Estate, Walbhat Road, Goregaon East, Mumbai-400063

2.As per MCA Circulars and SEBI Circulars, The Notice of Annual General Meeting with Annual Report of the year 2025-26 is required to send through electronic mode only and accordingly, Annual Report 2025-26 along with the Notice convening AGM is sent to the Members of the Company whose email addresses are registered with the Company/Depositories and Share Transfer Agent as on 4th September 2026. Annual Report Along with the Notice is available on the website of the Company www.vkmgroups.com and https://evoting.cdslindia.com/.

3.The Company has set 23rd September 2026 as the "Cut-off-Date" for taking records of the shareholders of the Company who will be eligible for casting their vote on the resolutions to be passed in the 41st Annual General Meeting. Any person who is a member of the Company on Cut-off date, is eligible to attend and cast vote on all the resolutions set forth in the Notice of Annual General Meeting.

4.Pursuant to regulation 42 of the SEBI(Listing Obligations and Disclosure requirements) Regulations, 2015 and Section 91 of the Companies Act, 2013 and applicable rule thereunder, the register of members and share transfer book for Equity Shares of the Company will remain closed from Thursday,24th September 2026 to Wednesday, 30th September 2026 (Both days inclusive).

5.Pursuant to the provisions of Section 108 of the Companies Act, 2013, Rule 20 of the Companies (Management and Administration) Rules, 2014, Regulation 44 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 and the Applicable Circulars, the Company is pleased to provide the Members with the facility to exercise their right to vote by electronic means (remote e-voting)of Central Depository Services (India)Limited (CDSL) for the businesses to be transacted at the AGM. The remote e-voting period commences on Saturday, 26th September, 2026 (9:00 A.M. IST) and ends on Tuesday, 29th September, 2026 (5:00 P.M. IST). The e-voting module shall be disabled by CDSL for voting thereafter. The facility for voting shall also be made available at the AGM for the Members who have not already cast their votes prior to the AGM by remote e-voting. The detailed procedure for e-voting is given in the AGM Notice.Once the e-vote on the resolution is cast by the members, they shall not be allowed to change it subsequently.

6.The person whose name is recorded in the register of members or in the register of beneficial owners maintained by the depositories as on the cut-off dateonly shall be entitled to avail the facility of remote e-voting as well as e-voting at AGM. Any person who becomes a member of the Company after the notice has been sent electronically by the Company, and holds shares as on the cut-off i.e. Wednesday, 23rd September, 2026may obtain the User ID and Password by sending an email request to helpdesk.evoting@cdslindia.com

7.For the process and manner of E-voting, Members may go through the instructions mentioned in AGM Notice. In case of any queries/grievance connected with e-voting, please contact:
Central Depository Services (India) Limited
Marathon Futurex, A-Wing, 25th floor, NM Joshi Marg, Lower Parel, Mumbai 400013or send an email tohelpdesk.evoting@cdslindia.comor call 1800-21-09911.

**For Veekayem Fashion and Apparels Limited**
Sd/-
Gopika Singh
Company Secretary

Place: Mumbai
Date: 07th September 2026

## SAROJA PHARMA INDUSTRIES INDIA LIMITED

CIN : L24110MH2019PLC319508
info@sarojapharma.com www.sarojapharma.com
+022 20810011
209, Ecstasy Business Park, City of Joy Complex, JSD Road, Mulund (W), Mumbai-400080.

**NOTICE of 08TH ANNUAL GENERAL MEETING AND E-VOTING INFORMATION**

NOTICE is hereby given that the 08th Annual General Meeting ("AGM") of Saroja Pharma Industries India Limited ("the Company") will be held on Wednesday, 30th September, 2026 at 11.00 a.m. (IST), through Video Conferencing ("VC") / Other Audio-Visual Means ("OAVM") to transact the business as set out in the Notice calling the AGM. In compliance with all the applicable provisions of the Companies Act, 2013 ("the Act") read with the MCA General Circular No. 14/2020 dated 8th April, 2020, MCA General Circular No. 17/2020 dated 13th April, 2020, MCA General circular No. 20/2020 dated 5th May, 2020, MCA General Circular No. 02/2021 dated 13th January, 2021, MCA General Circular No. 02/2022 dated 5th May, 2022 and MCA General Circular No. 11/2022, SEBI Circular dated 12th May, 2020, SEBI Circular dated 15th January, 2021 issued by the Ministry of Corporate Affairs ("MCA") and Circular No. SEBI /HO/CFD/CMD1/CIR/P/1/2020/79 dated 12th May, 2020, Circular No. SEBI /HO/CFD/CMD2/CIR/P/1/2022/62 dated 13th May, 2022 and Circular No. SEBI/HO/CFD/PoD-2/P/CIR/2023/4 dated 05th January, 2023 issued by the Securities and Exchange Board of India ("SEBI") (collectively referred as "relevant circulars"), and the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulation, 2015 ("SEBI LODR").In line with the MCA circulars and SEBI circulars, the Company has completed the dispatch of Notice of the 8th AGM and Annual Report of the Company, inter-alia, containing the Financial Statements and other statutory reports for the Financial Year ended 31st March, 2026 on 07th September 2026 only through electronic mode to all the Members of the Company whose email addresses are registered with the Depository Participant(s). The aforesaid documents are also available on the Company's website at www.sarojapharma.com and on the website of the National Stock Exchange of India Limited at www.nseindia.com and website of the NSDL at www.evoting.nsdl.com.

In compliance with Section 108 of the Act read with Rule 20 of the Companies (Management and Administration) Rules, 2014 as amended from time to time and Regulation 44 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, Members holding shares in physical and dematerialized form, as on the cut-off date Wednesday, 23rd September, 2026, may cast their votes electronically on the business as set forth in the Notice through the electronic voting system of NSDL ("the remote e-voting").

All the Members hereby informed that:

i. The Business as set forth in the Notice of the AGM will be transacted through voting by electronic means only;

ii. Pursuant to the provisions of Section 91 of the Companies Act, 2013, the Register of Members and the Share Transfer Books of the Company will remain closed from Thursday, 24th September 2026 to Wednesday, 30th September, 2026 (both days inclusive) for the purpose of the 8th AGM.

iii. The cut-off date for determining the eligibility to vote through remote e-voting or through e-voting system at the AGM shall be Wednesday, 23rd September, 2026.

iv. The remote e-voting shall commence on Friday, 26th September, 2026 at 09:00 A.M. IST.

v. The remote e-voting shall end on Monday, 29th September, 2026 at 05:00 P.M. IST.

vi. Members who are holding shares in physical form or who have not registered their e-mail ID's, and any person who acquires shares of the Company and becomes a member post-dispatch of the Notice of the AGM and holds shares as on the cut-off date i.e., Wednesday, 23rd September, 2026, may obtain the log-in ID and password by sending a request at evoting@nsdl.co.in. However, if the person is already registered with NSDL for e-voting, the existing USER ID and password can be used for casting their vote.

vii. Members may note that:

a) The remote e-voting shall be disabled by NSDL beyond 05:00 P.M. (IST) on Monday, 29th September, 2026, and once the vote on a resolution is cast by the Member, the Member shall not be able to change it subsequently;

b) Members who have cast their vote by remote e-voting prior to the AGM may participate in the AGM through VC/OAVM facility but shall not be entitled to cast their vote on such resolution(s) again;

c) The facility for e-voting will also be made available during the AGM, and those members present in the AGM through VC/OAVM facility, who have not cast their vote on the resolution through remote e-voting and are otherwise not barred from doing so, shall be eligible to vote through the e-voting system at the AGM;

d) Only persons whose names are recorded in the Register of Members or in the Register of Beneficial Owners maintained by the Depositories as on the cut-off date shall be entitled to avail the facility of remote e-voting or e-voting at the AGM; and

e) The voting rights of members shall be in proportion to the equity shares held by them in the paid-up equity share capital of the Company as on Wednesday, 23rd September, 2026, being the cut-off date for this purpose.

viii. Details of the process/method of casting votes by Members are included in the AGM Notice.

ix. Members holding shares in demat mode may register their email ID's/update Bank Account mandate by contacting their respective Depository Participant ("DP").

x. In case of any grievances connected with the facility for voting by electronic means, you may refer to the Frequently Asked Questions ("FAQ's") for Shareholders and e-voting user manual available in the download section of www.evoting.nsdl.com, or call on toll-free no.: 1800 1020 990 and 1800 224 430, or send a request to NSDL at evoting@nsdl.com, or may write to the Company Secretary at the email ID cs@sarojapharma.com.

**For Saroja Pharma Industries India Limited**
Sd/-
Nikita Kumar
Company Secretary

Place: Mumbai
Date: 08th September 2026